खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

# साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालय

राजगुरुनगर

**दिनांक:- २४/०२/२०२५**

## विद्यार्थी विकास मंडळ आयोजित

## “निर्भय कन्या अभियान”

## अहवाल

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे व विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमानाने निर्भय कन्या अभियान दिनांक 24 फेब्रुवारी २०२५ रोजी राबवण्यात आले. सदर अभियानामध्ये एकूण 159 मुली उपस्थित होत्या. व 7 महिला प्राध्यापिका उपस्थित होत्या.

निर्भय कन्या अभियानांतर्गत मार्गदर्शन करण्यासाठी ग्रामीण रुग्णालय चांडोली या ठिकाणी कार्यरत असणारे मा.श्री डॉ.निरंजन मोरे व कल्पतरू या संस्था मध्ये सक्रीय असणाऱ्या मा. श्रद्धा पवळे उपस्थित होते. मा. श्रद्धा पवळे यांनी आजच्या युवती समोरील आव्हाने यावर मार्गदर्शन करताना उद्बोधक भावना व्यक्त केल्या. त्या म्हणाल्या स्त्री म्हणून जगताना स्त्रियांसमोर अनेक आव्हाने पूर्वीही होती, आजही आहेत. माणूस हा समाजप्रिय आहे. माणसाच्या जन्मांनंतर तो या समाजाचा घटक बनतो. त्यामुळे आपसूकच समाज, सामाजिक बंधने या गोष्टीचा प्रभाव व्यक्तीवर पडतो. पुढे त्यातूनच सामाजिक समस्या, आव्हाने निर्माण होतात. काही सामाजिक आव्हानांना स्त्रीला तिच्या जन्मापासूनच किंबहुना जन्माआधीपासूनच सामोरं जावं लागतं. स्त्री ही नेहमीच आई, बहीण, पत्नी, सून अशा

विविधांगी नात्यांमधून आपली कौटुंबिक जबाबदारी समर्थपणे पेलत असते. अख्ख्या घराचा ती कणा असते. महत्त्वाची गोष्ट म्हणजे, देशाच्या विकासातील एक महत्त्वाचा घटक म्हणून आजच्या युवतीकडे पाहिले जाते. आजच्या युवती  म्हणजे उद्याचे मुख्य आधारस्तंभ व मार्गदर्शक म्हणून त्यांची गणना करण्यात येते. तेव्हा त्यांना सन्मानाने जगू द्या. आपल्या देशात मुलींसमोर अनेक आव्हाने आहेत आणि ती आव्हाने देशाच्या विकासाला मारक ठरत आहेत. त्यासाठी मुलींना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्या लागतील. तरच आपल्या देशातील मुली आव्हानांचा आत्मविश्वासाने सामना करू शकतील.

तसेच डॉ. निरंजन मोरे यांनी महिला सबलीकरण या विषयावर मार्गदर्शन करताना प्रभावी मत व्यक्त केले. महिला सबलीकरण म्हणजे महिलांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने हक्क आणि दर्जा देणे. या प्रक्रियेतून स्त्री-पुरुष असमानता नष्ट करण्याचा प्रयत्न केला जातो. स्त्रीला एक मानव म्हणून विकास करण्याची समान संधी, लिंगभेदविरहित समाजव्यवस्था निर्माण करणे आणि तिच्या नावे जन्मापासूनच अंकित केलेला दुय्यम दर्जा मिटवून तिच्या ठायी असलेले कौशल्य, सामर्थ्य आणि इतर गुणांना वाव मिळणे अपेक्षित आहे.नवरात्रोत्सवाचे नऊ दिवस म्हणजे स्त्रीशक्तीचा जागर. समाजात महिलांना स्वायत्तता, सुरक्षा व संरक्षण देण्यासाठी सबलीकरणाचे अभियान राबविण्यास सुरुवात करतो; पण याच वेळी या समाजाला प्रश्न विचारावासा वाटतो, खरंच भारतातील महिला अबला आहेत का? ज्यामुळे आपण तिला सबला बनविण्याचा प्रयत्न करत आहात आणि खरंच महिलांचे सबलीकरण होते आहे का? आपल्या देशाची अर्धी लोकसंख्या ही महिलांची आहे. या लोकसंख्येसाठी सरकारद्वारे मातृ दिवस, महिलादिन, बालिकादिन, जननी सुरक्षा अभियान असे कार्यक्रम राबविले जातात. त्यामुळे समाजात स्त्री शक्तीचे महत्त्व व अधिकार जागृत करण्याचे काम केले जाते; पण यासोबत आज महिला सबलीकरण करताना सर्वप्रथम समाजात महिलांचे अधिकार व मूल्य यांच्यावर घात करणाऱ्या विघातक प्रवृत्ती अर्थात हुंडा प्रथा, स्त्री भ्रूणहत्या, निरक्षरता, लैंगिक अत्याचार, असमानता इत्यादींचा नाश करणे गरजेचे आहे. लैगिक भेदभाव नष्ट करून समानता प्रस्थापित करणे, तसेच सामाजिक, घरगुती अन्याय व अत्याचार यांच्याविरुद्ध कठोर कायदे व उपाययोजना करणे, त्याचबरोबर महिलांना शारीरिक, सामाजिक, आर्थिक व मानसिक स्वरूपात सशक्त बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे. अशा प्रकारे महिला सबलीकरण करणे म्हणजे पुरुषांना हिणवणे किंवा त्यांच्यापेक्षा श्रेष्ठता सिद्ध करणे असे नव्हे, तर फक्त महिलांना त्यांच्या नैसर्गिक गुणधर्म, क्षमता, परंपरा यांच्यासह समानतेने वागविणे होय. असा विचारप्रवाह समाजात प्रस्थापित झाला तर खऱ्या अर्थाने महिलांचे सबलीकरण होईल. स्त्रीशक्तीच्या रूपात देशात असलेले मनुष्यबळ विकसित करून स्त्रीशक्तीचे आरोग्य, शिक्षण, संस्कार व स्वालंबन हे चार आधारस्तंभ समाजाने भक्कम केले तर समाजात सुराज्य व स्वराज्य दिसेल आणि फक्त अभियानापुरते कागदोपत्री नाही, तर वास्तवात महिला

सबलीकरण झालेले असेल. आपल्या भारत देशाला पूर्ण विकसित बनवण्यासाठी व परिपूर्ण विकासाचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी महिला सबलीकरण महत्त्वाचे ठरेल.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एच.एम जरे, विद्यार्थी विकास अधिकारी प्रा.शिवम कदम

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी गणेश आहेरकर , प्रा.पी.एन.गदादे.प्रा.ए.एच.इनामदार, प्रा.पी एस. गायकवाड, प्रा.पी.बी.पिंगळे,प्रा मोनिका जाधव, प्रा.एस.डी.आदक, प्रा.एल.बी.काठे व डॉ.टी. बी वेहले उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.शिवम कदम यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा.जी.जी.आहेरकर यांनी केले.

प्रा.एस.डी.कदम

# निर्भय कन्या अभियानाचे फोटो







मार्गदर्शन करताना डॉ. निरंजन मोरे

मार्गदर्शक करताना मा.श्रद्धा पवळे







निर्भय कन्या अभियानामध्ये सहभागी झालेल्या विद्यार्थिनी व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एच.एम.जरे मार्गदर्शन करताना